**प्रेसनोट**

दि.०३/१०/२०२०

मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील दोन पोलीस कर्मचाऱ्यांनी २० हजार रूपयांची लाच मागणी करून स्वीकारल्या प्रकरणी कारवाई

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | मंचर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे गु.र.नं ६०८/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - १) प्रशांत सुरेश भुजबळ, वय - ३३ वर्षे, पोलीस शिपाई ब.नं. २६३८<br>१) कृष्णदेव सुभाष साबळे, वय - ३१ वर्षे, पोलीस शिपाई ब.नं. २८८१<br>दोघे नेमणुक - मंचर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) |
| लाच स्विकारली रक्कम | २०,०००/- (वीस हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- ०१/१०/२०२०,<br>गुन्हा दाखल दिनांक :- ०२/१०/२०२०<br>यातील तक्रारदार क्रिकेट बेटिंग चालवतो म्हणून वरील लोकसेवक १ व २ यांनी त्यास ताब्यात घेऊन त्या प्रकरणी कारवाई न करण्यासाठी त्यांच्या कडून ५०,०००/- रूपये दिनांक ३०/०९/२०२० रोजी घेतले होते. त्या प्रकरणी कारवाई न करणे व सदरची क्रिकेट बेटींग पुढे सुरू ठेवण्यासाठी ५०,०००/- रूपयांची लाच मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रूपयांची मागणी करून ती स्विकारली असता त्या दोघांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>दोन्ही अटक आरोपी लोकसेवक याना मा. विशेष न्यायालय खेड येथे हजर केले असता न्यायालयाने दिनांक ०६/०५/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. पुढील तपास श्रीमती अलका सरग, पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. पुणे या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, मा. श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.